3

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** अक्कलकोट उत्तर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0227 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/05/2024 00:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 27/05/2024

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/05/2024

**Time From (वेळेपासून):** 15:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/05/2024 **Time (वेळ):** 00:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/05/2024 00:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भूमी अभिलेख कार्यालय अक्कलकोट,भूमी अभिलेख कार्यालय अक्कलकोट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. श्रीपाद दिलीप कुलकर्णी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वटवक्ष स्वामी मंदिराजवळ, उत्त,वटवक्ष स्वामी मंदिराजवळ, उत्त, अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वटवक्ष स्वामी मंदिराजवळ, उत्त,वटवक्ष स्वामी मंदिराजवळ, उत्त,अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9270585543

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. संतोष रामलिंग हंचे | | | 1. 87/36, भवानी पेठ, सिध्देश्वर ह,87/36, भवानी पेठ, सिध्देश्वर ह,अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 27/05/2024

मी श्री. श्रीपाद दिलीप कुलकर्णी, वय-35 वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.वटवृक्ष स्वामी मंदिराजवळ, उत्तर महाव्दार अक्कलकोट समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देतो की, मो.नं.9270585543

मी वरील नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासह राहणेस असून माझे अक्कलकोट येथे पुस्तके विक्रीचा दुकान आहे. सदर व्यापारावर माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो. मी दि.19/10/2023 रोजी अक्कलकोट येथील सिटी सव्हे नं. 1677 मधील अविभक्त हिस्सा क्षेत्र 23/31 चौ.मी जागा तसेच सिटी सव्हे नं.1678 मधील अविभक्त हिस्सा क्षेत्र 146.06 चौ.मी जागा खरेदी केले आहे. त्यानंतर सदर मालमत्तेच्या मालमत्ता पत्रकावरून खरेदी देणा-यांची नावे कमी करून माझे नाव लागण्याकरीता मी उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मालमत्ता पत्रकावरील मयत व्यक्तींचे व त्यांच्या वारसांच्या नावावर कंस करून त्याप्रमाणे फेरफार नोंदी घेण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथील परिरक्षण भूमापक श्री. संतोष रामलिंग हंचे हे माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करीत होते. मी शुक्रवार दि. 24/05/2024 रोजी श्री. हंचे साहेबांना भेटलो असता, त्यांनी मला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 155 प्रमाणे खरेदी दिलेल्यांच्या नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंदी घेण्यात आलेले आहेत असे सांगुन केलेल्या कामाचा मोबदला म्हणून व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 258 प्रमाणे मयत व्यक्तीचे नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंद घेण्यासाठी प्रलंबित राहिलेल्या कामाकरीता म्हणून माझ्याकडे 5000/- रू लाचेची मागणी केली. मी खरेदी केलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता पत्रकावरील खरेदी देणा-यांची व मयत इसमांची नावे कमी करून माझे नाव लागण्यासाठी मालमत्ता पत्रकावर खरेदी देणा-यांचे व मयत व्यक्तीचे नावावर कंस करून फेरफार नोंद करण्यासाठी मागणी करण्यात आलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याने परिरक्षण भुमापक, श्री. संतोष हंचे यांचेविरुध्द योग्य ती कारवाई होणे करिता मी अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापुर समक्ष लाच मागणीची लेखी तक्रार नोंदविली. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पोनि कोळी यांनी सोलापुर जिल्हा परिषद, येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवुन त्यांची श्री. नागेश नाईकनवरे व दत्तात्रय देवकते अशी ओळख करुन दिली. त्यांनतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव-गाव विचारले असता, मी त्यांना माझे वरीलप्रमाणे नाव-गाव सांगितले. पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी भुमि अभिलेख कार्यालातील श्री. हंचे यांचेविरूध्द वरीलप्रमाणे तक्रार सांगितली आणि माझी तक्रार लेखी स्वरुपात लिहुन दिली. त्यावर मी, पोनि कोळी व दोन्ही पंच यांनी वाचुन सहया केल्या.

त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची, भुमी अभिलेख कार्यालय अक्कलकोट येथे जावुन पडताळणी करावयाचे असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी पोनि कोळी यांनी त्यांचे स्टाफ व आमची ओळख करुन दिली व पडताळणीसाठी लागणारे सर्व साहित्य गाडीमध्ये घेतले. त्यानंतर मी पोनि कोळी यांना शिवपुरी मठ समोर, अक्कलकोट स्टेशन रोड येथे जावुन थांबण्यास सांगितले आणि मी माझ्या मोटारसायकलवरून सदर ठिकाणी गेलो. माझ्या पाठोपाठ पोनि कोळी, पंच व त्यांचा स्टाफ शासकीय वाहनाने त्याठिकाणी आले. सदरवेळी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेसाठी पोनि कोळी यांनी मला व पंचास व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला व माझ्या सोबत पंच नं.1 नाईकनवरे यांना योग्य त्या सुचना देवून त्यांचेकडील व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून पंच नं.1 नाईकनवरे व मला भुमापक श्री.हंचे यांची भेट घेवून पडताळणी करण्यासाठी माझ्या मोटर सायकलवरुन रवाना केले.

त्याप्रमाणे मी व पंच नं.1 नाईकनवरे असे माझे मोटारसायकलने भुमिअभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथील मुख्यलेखा विभागात जावुन भुमापक श्री.हंचे यांची भेट घेवुन माझ्या मी खरेदी केलेल्या मालमत्तेवर नाव नोंद करण्याबाबत चर्चा करत असताना, भुमापक श्री.हंचे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 155 प्रमाणे खरेदी दिलेल्यांच्या नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंदी घेण्यात आलेले आहेत असे सांगुन

केलेल्या कामाचा मोबदला म्हणून व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 258 प्रमाणे मयत व्यक्तीचे नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंद घेण्यासाठी माझ्याकडे 3000/- लाचेची मागणी केली. त्यावेळी मी घरी जावुन घेवुन येतो असे बोलुन मी व पंच नं.1 नाईकनवरे असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हाईस रेकार्डर काढून पंच नं.1 नाईकनवरे व मला हकीकत विचारून घेतली. त्यावेळी आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी व पंचांनी रेकॉर्डरमध्ये माझ्यात आणि भुमापक श्री. हंचे यांच्यात झालेले संभाषण त्यांच्याकडील लॅपटॉपला व्हाईस रेकॉर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये भुमापक श्री. हंचे यांनी मी खरेदी केलेल्या मालमत्तेच्या मालमत्तापत्रकावर नोंदी करण्यासाठी माझ्याकडे 3000/- रु लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम भुमिअभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे घेवुन येण्यास सांगीतलेचे स्पष्ट झाले.

त्यानंतर पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी भुमापक श्री.हंचे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 3000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 06 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांचे सुचनेवरुन पोअं/सुरवसे यांनी एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यावर पोनि कोळी व दोन्ही सह्या केल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्यक्षिक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. सदर अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा त्यांनी मी नेसलेल्या टि- शर्टच्या वरील डाव्याबाजूच्या खिशामध्ये सुरक्षितरित्या ठेवल्या.
त्यानंतर यातील भुमापक श्री. हंचे यांच्यावर भुमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे अनुषंगाने पोनि कोळी यांनी मला, पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सूचना देवून, त्यांचेकडील व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून मला व पंच नं.1 नाईकनवरे यांना माझ्या मोटारसायकलवरुन रवाना केले आणि पोनि कोळी व पंच नं. 2, सापळा पथक असे शासकीय वाहनाने आमचे पाठीमागे येवुन भुमिअभिलेख कार्यालय येथे सापळा लावुन थांबले. मी व पंच क्र.1 नाईकनवरे असे भुमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे भुमापक श्री. हंचे यांचेकडे जावून त्यांची भेट घेतली व आम्ही बोलत-बोलत कार्यालयाचे बाहेर आलो. त्यावेळी श्री. हंचे यांनी हाताचे इशा-याने लाच रकमेची मागणी केली त्यावर मी माझ्या टि शर्टच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून भुमापक श्री. हंचे यांचे उजव्या हातात दिली असता त्यांनी ती रक्कम स्विकारुन, सदर रक्कम उजव्या हाताने, त्यांचे डाव्या हातात घेऊन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यांनतर मी लाच रक्कम स्विकारलेचा नियोजित इशारा केला, त्यावरुन पोनि कोळी, पंच नं. 2 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन भुमापक श्री. हंचे यांना ताब्यात घेतले.
सदर ठिकाणी पोनि कोळी यांनी भुमापक यांचे नाव-गांव व पद विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. संतोष रामलिंग हंचे, वय-53 वर्षे, पद- परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय, अक्कलकोट रा. 87/36, भवानी पेठ, सिध्देश्वर हाउसिंग सोसायटी, सोलापुर असे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही लाचलुचपत प्रतिबधक विभाग, सोलापुर कार्यालय येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दिनांक 27/05/2024 रोजी 15/10 वा. ते 16/24 वा. चे दरम्यान भूमी अभिलेख कार्यालय अक्कलकोट येथे आरोपी लोकसेवक श्री. संतोष रामलिंग हंचे, वय-53 वर्षे, पद-परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय अक्कलकोट यांनी मला मी खरेदी केलेल्या मालमत्तेच्या मालमत्तापत्रकावर खरेदी दिलेल्यांची नावे कमी करून माझे नाव लागण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 155 प्रमाणे खरेदी दिलेल्यांच्या नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंदी घेण्यात आलेले आहेत असे सांगुन केलेल्या कामाचा मोबदला म्हणून व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 258 प्रमाणे मयत व्यक्तीचे नावावर कंस करून त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकावर नोंद घेण्यासाठी प्रलंबित राहिलेल्या कामाकरीता तडजोडीवरून 3000/- रु लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वत: स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी श्री. संतोष रामलिंग हंचे, वय-53 वर्षे, पद-परिरक्षण भुमापक, भुमि अभिलेखक कार्यालय, अक्कलकोट यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून, तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(चंद्रकांत कोळी)

5



पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
snehal vilas chavan
**Rank (**पद**):** SI (Sub-Inspector) **No.(**क्र.**):** 15101000402SVC
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** RAJENDRA RANGNA
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PBMH79447